# "प्राचीन भारतीय बुद्धकालीन शिक्षण पद्धती"

**कौतिक नामदेव दांडगे**
**संशोधक विद्यार्थी , डॉ.बा.आ.म.विद्यापीठ औरंगाबाद जि. औरंगाबाद.**




**प्रस्तावना:-**

"नही ज्ञानेन सदृंश पवित्र मिह विद्यते"

या शब्दात गितेने ज्ञान महात्म्य सांगितले आहे. भारतीय संस्कृतिक ज्ञान प्राप्तीला अनन्य साधारण महत्व आहे. वैदिक, जैन, बौद्ध व हिंदू धर्मांनी ज्ञानाला श्रेष्ठ स्थान दिले होते. या सर्वांनी ज्ञानमार्गाचा अवलंब केला होता. कारण मुनष्यांची भौतिक व आध्यात्मिक उन्नती ज्ञानाशिवाय शक्य नाही. ही गुरुकिल्ली त्यांना माहित होती.

भारतीय शिक्षण प्रणालीच्या विकासात बौद्ध धर्माचा सिंहाचा वाटा होता. या धर्माच्या अनुयायांनी आरंभापासूनच धर्मप्रचारासाठी शिक्षणाची कास धरल्यामुळे शिक्षणाचा विस्तार झाला. मुख्यत्वे बौद्ध विहारात ही विद्यालये चालविली जात.

आधुनिक काळात देखील ज्ञानाचे महत्व ओळखून महात्मा फुलेंनी स्त्रीशिक्षणाचा अट्टाहास धरला. डॉ.आंबेडकरांनी देखील शिक्षणाचे महत्त्व पटवून देतांना असे सांगितले की शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे. शिक्षणामुळेच मनुष्यांची सर्वांगिण उन्नती होते. परंतु प्राचीन बुद्ध कालीन शिक्षण पद्धती श्रेष्ठदर्जाच्या मानवी मूल्यांवर आधारलेली होती.

महावीर व बुद्धानी ज्ञानप्राप्तीलाच प्राध्यान्य दिलेले होते. ज्ञान प्राप्त करण्याच्या विविध पद्धती प्राचीन भारतात रुढ झालेल्या होत्या. मानवी जीवन सुसह्य बनविणे माणसाची भौतिक, आध्यात्मिक व बौद्धिक उन्नती साधणे नितिमान, चारित्र्य संपन्न आदर्श पुरुष निर्माण करणे, ही प्राचीन शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये होती. शिक्षणपद्धती व शिक्षणसंस्थांची निर्मिती प्रारंभी वैदिक आर्यांनी केली. आणि तिचा विकास व विस्तार बौद्ध धर्मानी केला. भारतीय शिक्षणपद्धतीमुळे धर्म व संस्कृतीच्या प्रसाराला फार मोठी चालना मिळाली. शिक्षण क्षेत्राचा विकास धर्माच्या छत्रछायेखाली चालत असे.[१]

प्राचीन शिक्षण पद्धती सुव्यवस्थित होती. त्यामुळेच भारताच्या समस्त प्राचीन इतिहास विशाल साहित्य सुरक्षित व समृध्द राहिले. शिक्षणाचे महत्व प्राचीन ऋषींनी अनेक प्रकारातून समजाविले.

प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या पाया वैदिक संस्कृतीने घातला, तर त्याचा फार मोठा विस्तार बौद्ध धर्मामुळे झाला. प्राचीन भारतातल्या पाटलीपुत्र, नालंदा, विक्रमशिला, वल्लभी सारख्या मोठमोठ्या विश्वविद्यालयाची भरभराट बौध्द शिक्षण प्रणालीमधूनच झाली. वैदिक व बौद्ध शिक्षण व्यवस्थेत बरेच साधर्म्य होते. फाहियान, युवानच्यांग, इत्सिंग व अनेक बौद्ध ग्रंथामधून बौद्ध शिक्षण पद्धतीची माहिती मिळते. विद्यापीठाचे भौतिक अवशेष ईस्लामी आक्रमणामुळे नष्ट झाले.[२]

ज्ञान मिळविण्यासाठी दूरच्या देशातून लोक भारतात येत असे. स्त्रियाना देखील शिक्षणाचे स्वातंत्र्य होते. स्वतः राज्यश्रीने बौद्ध भिक्षू दिवाकर मित्रच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेतले. विहारातील अध्ययन पद्धतीतून अनेक बौद्धधर्मीय विद्यापीठांचा उदय झाला.

तक्षशिला विद्यापीठ सर्वात प्राचीन विद्यापीठ असून महत्वाचे शिक्षण केंद्र म्हणून प्रसिद्धीस आलेले होते. पाणिनी, चिकित्सा विशारद, आजीवक कौटिल्य व चंद्रगुप्त मौर्य यांनी तक्षशिला विद्यापीठात शिक्षण घेतले. राज्यशास्त्र युद्धशास्त्र, धनुर्वेद, व्याकरण, तत्त्वज्ञान व ज्योतिषशास्त्र, हे विषय विद्यापीठात शिकवत असे. इराणी आक्रमणांमुळे खरोष्ठी लिपी, ग्रिकांमुळे स्थापत्य कलेचा समावेश शिक्षणात करण्यात आला होता.[३]

प्रामुख्याने बौद्धांचे शिक्षणकेंद्र म्हणून नालंदा विद्यापीठांचा उदय झाला. या विद्यापीठांचा उदय गुप्त काळात झाल्यामुळे नालंदाचा संस्थापक कुमार गुप्त मानला जातो. प्रारंभी बौद्ध विहार अेस त्याचे स्वरुप असले तरी गुप्त राजे, हर्षवर्धन इ. आश्रयांमुळे आणि जागतिक किर्तीच्या विद्वानांमुळे इ.स ७ व्या शतकात नालंदा एक जगप्रसिद्ध विद्यापीठ बनले. हर्षवर्धनाने या विद्यापीठा २२० गावाचे उत्पन्न नेमुन दिले होते. या विद्यापीठात दहा हजार विद्यार्थी व पंधराशे दहा शिक्षक होते. गणित, इतिहास, व्याकरण, खगोलशास्त्र, ज्योतिष्य, तर्कशास्त्र इ. विषयांचे तेथे शिक्षण दिले जाई. नांलदा विद्यापीठ बौद्ध विद्यापीठ प्रामुख्याने बौद्ध विद्यापीठ असले तरी देखील हिंदू, जैन तत्त्वज्ञान व वेद, पुराणे ह्यांचाही अभ्यासक्रम चालत असे. तेथील विद्यार्थ्यांना शिक्षण, जेवण राहणे इ. गोष्टी मोफत मिळत असे. हुएनत्संग शिक्षणासाठी काही काळ नालंदा विद्यापीठात राहिला होता. त्यावेळी शिलभद्र ह्या विद्यापीठाचे कुलगुरु होते. त्याचे ज्ञानभंडार प्रचंड होते. असे हुएनत्संगाने वर्णन केले आहे. नालंदा येथील ग्रंथालयाला धर्मगंज असे नाव होते. ते भव्य व प्रचंढ मोठे होते. त्यामध्ये रत्नसागर, रत्नदधी, रत्नरंजन नावाच्या तीन ईमारती होत्या. त्यापैकी रत्नदधी ही इमारत नऊ मजली असून, विशाल प्रासादासारखी भव्य होती.[४]

विद्यापीठाच्या आवारात उदयाने, क्रिडांगणे, स्नानगृहे ह्यांचीही व्यवस्था होती. नालंदा विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी अतिशय कठिण अशी प्रवेशपरिक्षा होती० त्यात फारच कमी विद्यार्थी उत्तीर्ण होत. मात्र ह्या विद्यापीठातूनउत्तीर्ण झालेल्यांना पंडीत म्हणून समाज मान्यता मिळत होती. ह्या विद्यापीठाच्या किर्तीमुळे मध्य अशिया, सिलोन, तिबेट, ब्रम्हदेश, जावा, सूमात्रा, चीन इ. दुरदुरच्या देशातून विद्यार्थी शिकवयास येत त्यामूळे भारतीयच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडातील ते एक प्रमुख शैक्षणिक केंद्र बनले होते. धर्मपाल, शांतरक्षित, सुबंधू या विद्वानांनीही नालंदाचे कुलगुरुपद विभूषीत केले होते. येथील विद्वान म्हणजे आचार विचार चारित्र्य इ. गुणांचे आदर्श होते. विदेशातही त्यांना सन्मान होता. पुढे मुसलमानी आक्रमणानी नालंदाच्या सर्व इमारतींना आगी लावल्या. त्यात प्रचंड मोठे ग्रंथालय भस्म झाले. हे जगदविख्यात विद्यापीठ काळाच्या पडदयाआड गेले.[५]

नालंदा विद्यापीठानी सामुदायीक शिक्षणावर भर दिल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या भरमसाठ वाढत गेली. हजारो विद्यार्थी प्रवेश घेण्यासाठी ईच्छुक असल्यामुळे लायक विद्यार्थी निवडण्यासाठी प्रवेश परिक्षा ठेवलेली होती. या परिक्षेस सिद्धीन असे म्हणत. विशेष विषयांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थांना बहुश्रुत ही पदवी दिली

जाई. सभा, प्रवचन, चर्चासत्रे, परिषदा या विविध माध्यमातून व्यासंगी विद्यार्थी तयार करण्याचा प्रयत्न विद्यापीठ करत असे. पाली संस्कृत, मागधी ब्राह्मी, खरोष्ठी व देवनागरी लिपीमधून शिक्षण दिले जाई.

**समारोप :**

प्राचीन बुद्धकालीन शिक्षणाच्या मुळाशी विशिष्ट विचारसरणी होती. आणि ती आधुनिक पाश्चात्यांपेक्षा वेगळी होती. कारण, वर्तमानकाळात धर्म व नितीमूल्यांचा शिक्षणांशी सुतराम संबंध नाही. आधुनिक मनुष्य दुराचारी असला तरी चालेल परंतु, तो बुद्धिमान असावा. ही शिक्षणाची स्थुल भूमिका आहे. प्राचीन शिक्षणात भौतिक शिक्षणाला प्राधान्य असले तरी त्यावर आध्यात्मिक व नैतिक मुल्यांचे नियंत्रण होते. नितिमत्ता व चारित्र्यासंपन्नता भारतीय शिक्षण पद्धतीचे दैदिप्यमान पैलू आहेत.

कांची हे दक्षिण भारतातील प्रसिद्ध विद्यापीठ होते. नागार्जुन, वात्सायन, बुद्धघोष, दिङःनाग व धर्मपाल हे आचार्य प्रामुख्याने कांचीने जगाला दिलेली देणगी आहे. वल्लभी विद्यापीठ हे हिनयान पंथाचे विद्यापीठ समजले जात असे या विद्यापीठात गुणमती, स्थिरमती व धर्मपाल अध्यापनाचे कार्य करित होते.

बौद्ध शिक्षण पद्धतीचे अवलोकन केल्यास तिने सामुदायिक सार्वत्रिक व उच्च शिक्षणांचा फार मोठा विचार केल्याचे ध्यानी येते. व्याकरण व वैद्यक शास्त्रात बौद्ध धर्मियांनी विशेष कामगिरी पार पाडली. प्राचीन काळी गुरु शिष्यांचे नाते जिव्हाळयाचे होते. या गुरु शिष्य परंपरेला अनन्यसाधारण महत्त्व होते. संयमी, नितीमान चारित्र्यसंपन्न एकनिष्ठ, शिस्तप्रिय आदर्श विद्यार्थी निर्माण व्हवा हा बुद्धकालीन शिक्षणपद्धतीचा हेतू होता.

बौद्ध विद्यापीठात सर्व प्रकारचे शिक्षण विद्यार्थांना उपलब्ध करून देण्यात येत असे. या व्यवस्थेमुळे विद्यार्थी स्वावलंबी झाला व त्याची उपजीवीकेची सोय झ ाली. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न आपोआपच सुटला. परंतु, याऊलट परिस्थिती आधुनिक काळात पहावयास मिळते. या शिक्षण पद्धतीतून सुशिक्षित बेरोजगाराची संख्याच वाढतांना दिसते.

प्राचीन भारतीय बुध्द कालीन शिक्षणपध्दती समृध्द असली तरी परिस्थिती सापेक्ष काही उणिवा होत्या. विहारात स्त्री शिक्षणाची सोय असली तरी विद्वान स्त्रियांचा उदय झाला नाही. वर्णव्यवस्थेच्याअभावाने शिक्षण व्यवस्था राबविल्याने सामान्य बहुजन समाज शिक्षणापासून वंचीन रहिला. विज्ञानशास्त्राकडे अपेक्षीत लक्ष दिले नाही. स्त्री अध्यापिका ही नव्हत्या, ह्या मुख्य बाबीकडे आपणास दुर्लक्ष करता येणार नाही.

**संदर्भसूची**

१. जोशी पी.जी., "प्राचीन भारताचा इतिहास", के सागर, पब्लिकेशन्स पुणे, २०१० पृ.क्र. ५८९
२. उपरोक्त, पृ.क्र. ५९३
३. कटारे अनिल, साखरे विजया, प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती, विद्या प्रकाशन, बुक्स, पब्लिकेशन्स औरंगाबाद, २००८
४. दिक्षीत नी.सी. प्राचीन भारताचा इतिहास", पिंपळापूरे पब्लिकेशन्स, नागपुर, १९९३, पृ.क्र.१५१
५. उपरोक्त पृ.क्र.